# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/०२/२०२५ (शुक्रवार)**

---

## खुन करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन उमरेड** :— सदर गुन्हा उमरेड पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा मांडवा, ता.भिवापुर जि. नागपुर येथे दिनांक २८/०२/२५ चे सकाळी ०९/१५ ते ०९/३० वा.दरम्यान घडला आहे.यातील फिर्यादी नामे प्रताप रमेश पवार, वय २७ वर्षे ,रा. मांडवा .ता.भिवापुर, जि. नागपुर याला गावातील लोंकांकडुन माहीत पडले कि त्याचा मामा मृतक नामे भगवानदास जगराम देवसुत वय अंदाजन ४४ वर्षे, रा. मांडवा, ता.भिवापुर, जि. नागपुर आणि आरोपी करमचंद कुवरसींग चव्हान, वय ५४ वर्षे, रा मांडवा,ता. भिवापुर, जि. नागपुर असे दोघेही सोबत सकाळपासुन आरोपीचे घरी मौजा मांडवा येथे हजर होते. आरोपी आणि मृतक या दोघांचे कोणत्यातरी अज्ञात कारणावरून आपसात वाद विवाद झाल्याने आरोपीने मृतक च्या गळयावर व चेह—यावर लोंखंडी सत्तुरने वार करून जिवाने ठार मारले आहे अशा फिर्यादीच्या तोडी रिपोर्ट पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम १०३ (१) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद आहे.

**सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे करमचंद कुवरसींग चव्हान वय ५४ वर्ष रा मांडवा, ता.भिवापुर जि. नागपुर याचा पोलीस शोध घेत असुन आरोपी शोध कामी श्वान पथक नागपुर ग्रामीण जिल्हा यांना बोलाविण्यात आले आहे. श्वान पथकाने आरोपी शोध काम सुरू केले आहे. आरोपी चे शोध कामी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण आणि उमरेड पोलीस यांचे पथक तयार करण्यात आले असुन विविध ठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली आहे.**

# विवाहीतेचा कौटुबिक छळ करून आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. नरखेड** :– फिर्यादी नामे सुरेश रामदासजी डोईजोड, वय – ६० वर्षे रा. शेंदुरजनाघाट तह.वरूड, जि.अमरावती यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे अप. २४७/२०१९ कलम ४९८(अ),३०६,३४ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील फिर्यादीची मृतक मुलगी नामे सौ ललिता उर्फ गौरी ओमप्रकाश मदनकर, वय – २८ वर्षे, रा. खारी वार्ड क्र.०३ नरखेड.हिच्या लग्राचे तीन वर्षा नतंर तिचे पती आरोपी क्र.०१ ओमप्रकाश अंबादास मदनकर वय – ३७ वर्षे आणि सासु आरोपी क्र.०२ गंगाबाई अंबादास मदनकर, वय – ६५ वर्षे दोन्ही रा.खारी वार्ड क्र.०३ नरखेड.यांचे कडून वारंवार मृतक महीलर हीला माहेर वरून कोणत्या न कोणत्या कारणावरून पैशाची मागणी करून तिचे चारित्रावर संशय घेवून शारिरीक व मानसीक त्रास देत होते. घटनेच्या आठ दिवसा पूर्वी आरोपीतांनी यातील मृतक महिले कडून तिच्या वडीलांना फोन करून आरोपीतांच्या शेतातील बगीचाला फवारणी व खत देण्याकरीता २५,०००/– रूपयाची मागणी केली होती. फिर्यादीने पैसे न दिल्याने घटना ता.वेळी व ठिकाणी आरोपी क्र.०१ व ०२ यांनी मृतक महिलेचा शारिरीक व मानसिक छळ करून तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने मृतक हिने पंख्याच्या कडीला दोराचे सहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून गुन्हा होता.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस उपनिरीक्षक श्री अरूण खुटेमाटे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. न्यायालयात सादर केले होते. आज दिंनाक २८/०२/२०२५ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश – १३ श्री.एन.एच.जाधव यांनी वरील नमुद दोन्ही आरोपीतांना कलम ४९८(अ) भादवि मध्ये ०२ वर्षे सश्रम कारावास व प्रत्येकी ५०००/रू दंड,दंड न भरल्यास ०३ महिने साधा कारावास. तसेच कलम ३०६,३४ भादवि मध्ये ०३ वर्षे सश्रम कारावास व प्रत्येकी ५०००/रू दंड, दंड न भरल्यास ०३ महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने ए. पी. पी. श्रामती मैथिली काळविट यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा/७९ अशोक कोरडे,नेमणुक पो.स्टे नरखेड यांनी मदत केली आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक २७/०२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नयाकुंड शिवार ,पारशिवणी येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक **ट्रॅक्टर क्र. एम एच ४० ए. एम. ००२७ हे विना नंबरची ट्रॉलीसह मिळुन आले. सदर ट्रॅक्टर** ट्रॉली ची पाहणी केली असता ट्रॉली मध्ये रेती दिसुन आली. **ट्रॅक्टर चालक आरोपी क्र. १ नामे** आकाश तेजराम बोरीकर, वय २१ वर्षे रा. आमडी ता. पारशिवणी ,जि. नागपुर याला परवाण्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या जवळ कोणताही परवाना नसल्याची माहीती प्राप्त झाली. तसेच **ट्रॅक्टर मालकाबाबत विचारपुस केली असता मालकाचे नाव** शुभम चेतराम बोरीकर, वय २५ वर्षे, रा. आमडी, ता. पारशिवणी, जि . नागपुर असे असल्याचे समजले. मालकाच्या सांगण्यावरून रेतीची चोरटी वाहतुक केल्याची माहीती आरोपीकडुन प्राप्त आली. पोलीसांनी पंचासमक्ष **वाहनातुन १) १ ब्रास रेती किंमती ४,०००/रूपये आणि २) ट्रॅक्टर क्र. एम एच ४० ए. एम. ००२७ किंमती ५,००,०००/—रूपये ,३) विनाक्रमांची ट्रॉली किंमती १,००,०००/—रूपये असा एकुण ६,४०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

आरोपी वाहन **चालक** आकाश तेजराम बोरीकर, वय २१ वर्षे रा. आमडी,ता. पारशिवणी जि. नागपुर **आणि मालक** शुभम चेतराम बोरीकर वय २५ वर्षे, रा. आमडी, ता. पारशिवणी जि. नागपुर यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन पारशिवणी येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) म.ज.म. संहीता सहकलम ४,२१ खान खनिज अधिनियम ,सह कलम सहकलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान अधि. १९४८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. **आरोपी क्र १ याला अटक करण्यात आली आहे.**

## अवैध शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन कन्हान :— दिनांक २७/०२/२०२५ रोजी कन्हान पोलीस पायदळ पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय माहीती मिळाली की, एक इसम लोकांमध्ये दहशद निर्माण करण्याचे उद्देशाने कन्हान नदीचे पुलावर लोखंडी धारधार तलवार घेवुन फिरत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी गेले असता आरोपी गोकुल मनोज सिन्हा उर्फ पाटील, वय २५ वर्षे रा. लुंबीनी नगर, झोपडपट्टी, जरीपटका, नागपूर हा मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी धारदार तलवार ज्याची एकुण लांबी १९ इंच पात्याची लांबी १५ इंच असलेली मिळुन आल्याने सदर मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.

**आरोपी नामे—** गोकुल मनोज सिन्हा उर्फ पाटील, वय २५ वर्षे रा. लुंबीनी नगर, झोपडपट्टी, जरीपटका, नागपूर ,**जि नागपुर याच्या विरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास कन्हान पोलीस करीत आहे.**

## पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे सेवानिवृत्त अधिकारी यांचा सत्कार समारंभ

पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण जिल्हा, पोलीस भवन येथे शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ ठेवण्यात आला होता. सदर समारंभात श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण यांच्या हस्ते सेवानिवृत्त झालेले अधिकारी **१.श्रेणी पोउपनि प्रमोद नामदेवराव कडबे, नेमणूक जिल्हा विशेष शाखा नागपूर ग्रामीण,२. श्रेणी पोउपनि लक्ष्मीकांत कृष्णराव बोंद्रे, नेमणूक पोलीस स्टेशन नरखेड, ३. श्रेणी राजु सुदामजी गोमकर, नेमणूक पोलीस मुख्यालय नागपुर** ग्रामीण यांचा शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देवुन सत्कार करण्यात आला असुन **श्री. रमेश**

**धुमाळ, अपर  पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण यांनी सेवानिवृत्त अधिकारी यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.** सदर कार्यक्रमात श्री. रमेश धुमाळ अपर  पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण, श्री अजय मानकर ,पोलीस निरीक्षक मानव संसाधन शाखा हे हजर होते.







पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर